
# स्पंदन

वर्ष : २०१७-२०१८

## साहित्यातून व्यक्तिमत्त्वविकासाकडे







# 'स्पंदन'

- मुखपृष्ठ कल्पना : भरत पोफळे
- पृष्ठ सजावट : निहाल मेस्त्री
- सहाय्यक सजावट : अक्षता साळवी, दिव्या बापर्डेकर.
- हस्तपुस्तिका लेखन : रश्मी काळंबे
- हस्तपुस्तिका बांधणी : आश्लेषा राणे
  सुब्रम्हण्यम अय्यर
- मागील पृष्ठ कल्पना : भरत पोफळे
- संपादक : डॉ. आकांक्षा गावडे.
- साहित्य : प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष
  विद्यार्थी समूह.

# संपादकीय

आजच्या संगणकयुगात सगळं जग जवळ आलय खरं, पण... पण कुठेतरी त्यातील भावना हरवल्याचा भास होतोय. इतकं कृत्रिम आयुष्य काय कामाचं? आयुष्यातील हा कृत्रिमपणा दूर करायचा असेल तर संगणकाच्या बटनाला दाबण्यापेक्षा आपल्या हाताच्या बोटांना जवळ आणणं गरजेचं आहे. ही गरज विद्यार्थ्यांनी जेव्हा लक्षात आणून दिली, तेव्हा विद्यार्थी मित्रांच्या हाती लेखणी आली. अन् मग... मग हृदयाच्या रसरंगात भावनांचं मिश्रण होऊन एकामागोमाग एक सुंदर कलाकृती प्रसवू लागल्या. या विविध कलाकृती म्हणजेच आमच्या विद्यार्थ्यांच्या हृदयातील मराठी वाङ्मयाची स्पंदनं आहेत.

वाचकहो, समजून घेताय ना ही स्पंदन...? 'स्पंदन' या हस्तलिखिताचं हे चवथं वर्ष. यावर्षी ललित लेख, कथा, कविता या माध्यमातून विद्यार्थी मित्रांनी आपल्या अंतरीच्या उमाळ्याला वाट करून दिली आहे. त्यांच्या अंतरंगातील विविध भावनांचं हे इंद्रधनुष्य इथे व्यक्त होतयं ते फक्त 'आत्मसुखाय' या प्रयोजनाची पूर्तता करण्यासाठी.

विद्यार्थी मित्रांनो, आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने मराठी साहित्याला नेहमीच आपण गोंजारत रहा! स्वतः विकसित व्हा! आणि साहित्य निर्माण करताना प्रथम साहित्य मनापासून जगा. मेवाडच्या राधा-कृष्ण संमीलनातून निर्माण होणाऱ्या अद्वैतरूपी चित्राप्रमाणे मराठी साहित्याशी आपले अनुबंध जुळोवेत हीच सदिच्छा! सतत वाचत रहा! सतत लिहीत रहा!

तुमच्या भावी लेखनीसाठी खूप-खूप शुभेच्छा!

डॉ. आकांक्षा गावडे.
(मराठी विभाग)

# चला संघटित होऊ या

'जात' हा शब्द कसा निर्माण झाला ? ह्या शब्दाची निर्मिती ही
कुठुन झाली ? ही संकल्पना समजून घेण्यासाठी आपण 'जात' या संकल्पनेचा
सविस्तर विचार करू.

'जात' हा शब्द मानवाशी निगडित असलेला दिसून येतो. समाजातील
प्रत्येक व्यक्तीला त्याच्या जन्मापासून 'जात' प्राप्त होते. आणि तेव्हापासूनच मरेपर्यंत जी कधी
पुसली जात नाही ती जात असते.

आई - मुलावर लहानपणापासूनच संस्कार घडवते. व त्याला बोलायला
शिकवते. या शिकवणीतूनच त्या मुलाला 'जात' ही संकल्पना हळूहळू समजते.

समाजातील प्रत्येक व्यक्ती हा एकच असून समाजातील प्रत्येक व्यक्ती
हा एकच असून समाजातील गैरसमजुतीमुळे लोकांच्या मनात अनेक वाईट विचार येऊन
व्यक्तींमध्ये त्यांनी स्वतःच्या सोयीसाठी निर्माण केलेल्या जातीमध्ये हे भेद पडले जातात.

" सर्व धर्म समभाव "

हे उद्गार काढणारी व्यक्ती जी असते. तिची मानसिकताही कालमानानुसार
बदलते. आणि तिच्या वर्तनातुन 'जात' ही संकल्पना व्यक्त होवू लागते.

पण असे का घडते ? समाजातील प्रत्येक व्यक्तीचे रंग, रूप, अवयव
हे एकच असून माणूस हा समाजात निर्माण होणाऱ्या गैरसमजुतीमुळे जातीयवादाच्या भोवऱ्यात

अडकलेला दिसतो. या जातीभेदांमुळे समाजात अनेक भांडण तंटे निर्माण होऊन हा असंतोष वाढत जाऊन व्यक्तीच्या मनात किल्मिषे निर्माण होतात.

जाती- भेद होण्याचे मुख्य कारण म्हणजे ? राजकारण :-

या राजकरणातही प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या जातीचा असतो. हेच लोक समाजातील लोकांच्या मनात कोणतीही अफवा पसरून लोकांना एकमेकांपासून दूर करण्याचा प्रयत्न करतात. या जातीयवादात जास्त भरडले जातात. ते दलित समाजातील लोक हे दलित लोक इतर लोकांप्रमाणेच असूनही त्यांना सवर्णीयांपासुन वेगळे पाडले जाते ? व त्यांचे हक्क आणि अधिकार असे का घडते ?

प्राचीन काळापासून समाजात असणाऱ्या व्यक्तींच्या दलितांना एकदम निम्न स्तरावर स्थान दिले गेले. त्यांना दुर्लक्षित जीणे जगावे लागत होते. या दलित लोकांना समाजा-पासुन वेगळे पाडुन त्यांना वाळीत टाकले जाते असे का घडते ? खरे पाहता या दलितांवरील पिढ्यानुपिढ्या होणाऱ्या अत्याचारामुळे अन्यायाला दूर करण्यासाठी आंबेडकरांनी त्यांना संदेश दिला.

" शिका, संघटित व्हा, संघर्ष करा "

परंतु अस्पृश्य वर्ग शिक्षणापासुन वंचित्य राहिला. परिणामी त्यांना आज अनेक गैरसमुजींच्या चक्रात अडकावे लागते. दलितांनी जर शिक्षण घेतले तर ते आपल्यावरील अन्यायाला विरोध करतील आणि आपल्या स्वतःचे रक्षण करतील. व अस्पृश्यांना पुढे येण्यास व आपले अधिकार घेण्यास ही नवी संधी मिळेल. व कोणत्याही जातीच्या व्यक्तीपासुन हा दलित समाज वेगळा पडणार नाही. व हाही समाज प्रत्येक जातीतील लोकांसोबत एकत्र राहील.

प्रत्येक व्यक्तीने प्रत्येक धर्माचा हा आदर बाळगावा व मनात कोणतीही गैरसमजूत निर्माण न देता व मनात कोणतीही जातीमध्ये भेदभाव निर्माण करू नये.

'सर्व धर्म समभाव' ही संकल्पना मनात ठेवावी. म्हणजे कधी आपापसातील अंतर्गत स्वरूपाची भांडणे होणार नाहीत. सर्वजण संघटित होतील आणि देशावरील आतंकवादाच्या हल्ल्यांविरोधात बंड पुकारून देशाचं रक्षण करतील यात शंकाच नाही. तेव्हा लोकहो जातीभेद विसरून चला संघटित होऊया !

योगिता कसबे
तृतीय वर्ष कला

# आई



आई तुझ्या मुर्ती वानी या जगात दुसरी मुर्ती नाही।
अनमोल जन्म दिला ग आई तुझे उपकार फिटणार नाहीत ॥

बालपणी मी खेळ खेळत होते जेव्हा।
अमृताहुनी गोड पाजला तू पान्हा ॥

तुझ्या या उपकाराची कधी जाणीव झाली नाही।
अनमोल जन्म दिला ग आई तुझे उपकार फिटणार नाही ॥

शाळेतुन घरी येताना आई उशीर मजला होई।
गल्लोगल्ली पाहीत फिरे अन हाक मारी ॥

तुझ्या या प्रेमाची कधी जाणीव झाली नाही।
अनमोल जन्म दिला ग आई तुझे उपकार फिटणार नाही ॥

आई तुझ्या मुर्तीवाणी या जगात मुर्ती नाही।
अनमोल जन्म दिला ग आई तुझे उपकार फिटनार नाही ॥

अर्चना शिंदे
(तृतीय वर्ष - कला)

# आई

आईसाठी काय लिहू
आईसाठी कसे लिहू
आईसाठी पुरतील एवढे शब्द नाहीत कोठे
आईवरती लिहिल्या इतपत नाही मासे
जीवन हे रीत तर आई म्हणजे विहिर
जीवन ही नौकातर आई म्हणजे तीर
जीवन ही शाळा तर आई म्हणजे पाटी
जीवन हे कामच काम तर आई म्हणजे सुट्टी
आई तू उन्हामधली सावली
आई तू पावसातली छत्री
आई तू थंडीतली शाल
आई म्हणजे मंदिराचा उंच कळस
आता यावीत दुःखे खुशाल
आई म्हणजे अंगणातील पवित्र तुळस
आई म्हणजे भजनात गुंतावी अशी संतवाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी अशी लयबद्ध टाळी
आई म्हणजे वेदनेनंतरची सर्वात पहिली आरोळी
"आई"... "आई"... "आई"... असते...

देऊळ नसते...
देव नसते...
दुधावरती साय नसते...
फुल नसते...
चंद्र, तारा, वारा, चांदण्या, आकाश नसते...
अथांग अथांग सागर नसते...
"आई"... म्हणजे नक्की काय...?
कोणीही सांगू शकणार नाही...
पण तरीही मला वाटते...
"आई"... म्हणजे तीच्या मुलाला...
या जगात तुच "सर्वश्रेष्ठ" आहेस...
असा आत्मविश्वास देणारी...
एक महान... प्रेमळ... व्यक्ती... असते !!!
"आई"... "आईपण"... असते... !!!

सकाळी सकाळी थपाटे घालुन उठवते... ती असते आई
उठल्या उठल्या आवडीचा नाश्ता बनवुन देते... ती असते आई
नाश्ता संपवायच्या आत डब्याची काळजी करते... ती असते आई
काय करीन ते घेऊन जा म्हणताना सगळा काही आवडीचे करुन देते... ती असते आई

मोनिका यादव
(तृतीय वर्ष कला)

साडीला हात पुसत व्यवस्थेत जा म्हणते ती असते आई
परतण्याची आतुरतेने वाट बघत बसते... ती असते आई
आपण झोपेपर्यंत सतत जागी राहते... ती असते आई
आणि जिच्याशिवाय आपल संपूर्ण आयुष्यच अपूर्ण असते...
ती असते आई...!
ती असते आई...!

मोनिका यादव
(तृतीय वर्ष कला)

# अहंपणा

छकदा ६९० विकुण पहा...
जेव्हा कोणीही घेणार नाही
तेव्हा समजेल किती फालतू गोष्ट
आपण इतके दिवस बाळगत होतो...?

बोलावे तर विचार करून...
नाहीतर बडबड सगळेच करतात...
ऐकावे तर अंत:करणातून...
आरोळी तर सारेच देतात...

टिपावं तर अचूक टिपावं...
नेम तर सारेच धरतात...
शिकावं तर माफ करायला...
राग तर सगळेच करतात...

खळगी भरावी तर उपाशी पोटी...
पोट भरून तर सारेच जेवतात...
प्यावे तर दुसऱ्याच्या दु:खाचे विष...
सुखाचे घोट तर सारेच घेतात...

## जगावं कसं ?

जगावं तर इतरांसाठी ...
स्वतः साठी तस सगळेच जगतात ...
ठेवावा तर शत्रुवर पण विश्वास
घात तर सगळेच करतात ...
दुःखामध्ये सुद्धा रहावं हसत
वेळ तर सर्वांचीच येते ...
झालं तर आयुष्यांच सोन व्हावं
राख तर सर्वांचीच होते ...

प्रकाश बावधाने
(द्वितीय वर्ष कला)

# नेत्रदान हेच श्रेष्ठदान

ह्या जगात असे खूप डोळे आहेत.
ज्यांनी हे जग सुंदर आहे हे फक्त छेकलय ! पहिल नाही आहे.

ह्या जगात असे खूप डोळे आहेत.
ज्यांनी आपल्याला जन्म देणारी आई पहिली नाही.

ह्या जगात असे खूप डोळे आहेत.
त्यांनी आपला स्वतः:या चेहरा सुध्दा पहिला नाही.
चंद्र पहिला नाही.
सूर्य पहिला नाही.

ज्यांना भरून आलेल आभाळ काय असत माहित नाही ?
ज्यांनी सुगंध मन भरून घेतलयं पण फुल पाहिल नाही.
एवढच नाहीतर माणूस कसा असतो हे सुध्दा त्यांनी पहिल नाही.

कारण का ?

तर ते पाहू शकत नाही.

स्वत :च आयुष्य संपल्यावर !
सरणावर डोळे जाळून टाकणारा !
कबरीत डोळे पुरून टाकणारा !
माणुस किती क्रुर दिसत असेल त्यांना ?

माणुस डोळे दान करू शकतो. आणि कुणाला तरी आपली नजर देऊ शकतो. अगदी सहज

माणस प्रोपर्टी वाटतात ! संपत्ती दान करतात.

पण...

फार कमी लोकांना वाटत कि आपली नजर आपण वाटली पाहिजे. दान केली पाहिजे. आपली दृष्टी पण जगाला दिली पाहिजे. लोकांच्या मनात खूप काळ जिवंत राहण्यासाठी.

विज्ञानाने ते काम सोप केलयं आज पर त्या गोष्टीवर लक्ष दिल नाही. पण आता वेळ आली आहे. फक्त लक्ष नाही. नजर दिली पाहिजे.

आपले डोळे नक्कीच कोणाला तरी दिले पाहिजेत.

देवा पुढे दिवा लावताना कातितरी पुण्य केल्याची भावना जशी आपल्याला मिळते ना.

मग एखाद्याच्या जिवनात डोळे देऊन प्रकाश देता आला तर किती मोठ पुण्य मिळेल आपल्याला.

माणुस गेल्यावर थोडे दिवस आठवण म्हणुन घरात लावलेल्या दिव्या पेक्षा कुणाच्या तरी डोळ्यातला कायमचा प्रकाश होण जास्त्तं चांगलं.

# डोळ्यांतील अश्रु

खर तर

डोळ्यांचं काम बघायचं असत. पण आज तुमच्याशी बोलावस वाटलं लिहावस वाटलं.

आपण कोणाचे डोळे आहोत हे जाम भारी वाटत. अर्थात जर त्या माणसाची नजर चांगली असेल तर नाही तर आम्हाला काय काय बघावं लागत ?

खर तर

डोळेंच फक्त असे असतात जे जन्मल्या पासून सारखेच असतात. डोळ्यांनामध्ये वाढ होत नाही का ? कदाचित वाढ माणसाच्या दृष्टीमध्ये व्हावी अशी अपेक्षा असते.

साय पसरली कि डोळे येतात. पण चांगली दृष्टी येण्यासाठी साथीचा फायदा होत नाही त्यासाठी स्वत:च चांगलं असावं लागतं.

डोळ्यांत साध्या धुळीचा कण सुध्दा सहन होत नाही. आम्हाला लगेच अश्रुनीं डोळे चालवलेली चिखल फेक जी असते त्याच काय करायच ?

खर तर...

जे मनात असतं ते बऱ्याचं लोकांच्या डोळ्यात दिसतं. मनातलं ओळखायची कला असली कि डोळ्यांतलं वाचायला अवघड जात नाही.

पण आज काल डोळ्यांपेक्षा चष्मे जास्त दिसतात. तरी नशीब छखाळसाच्या मनातलं ओळखायला चष्म्याच्या नंबराच्या अडथळा येत नाही. डोळ्यांतील भाव वाचायला

लेन्स ची गरज पडत नाही.

फांदा चिरतांना सुध्दा डोळ्यांतून पाणी येतं. वेदना झाली तरी. डोळे पाणावतात. म्हणून माणसांना अश्रूची किंमत म्हणावी तेवढा कळली नसावी.

नाही तर अश्रू ही या जगातील सर्वात सुंदर गोष्ट आहे. ही गोष्ट आज सार्वत्रिक स्तरावर मानवाने स्वीकारली असती.

मौल्यवान हिरे बघून माणसं स्वार्थी होतात. स्त्रीयांचं सौंदर्य बघून घायाळ होतात. पण अश्रू बघून बहुतेक माणस भावुक का होतात. खर तर माणूस होतात. ते माणुसकी निर्माण होते त्यांच्यात अश्रू एवढी ताकद शस्त्रातही नाही. तरी ही माणसांना अश्रूची किंमत कळलेली नाही अजून.


कुणी भेटल्या भेटल्या आनंदात आपल्या गळ्यात पडुन रडावं आपल्याला निरोप देताना.

झाडाच्या पानावर अडकलेल्या दवबिंदू सारखा झाडाच्या पानावर कुणाच्या डोळ्यात एक थेंब यावा. कुणाच्या डोळ्यात एक थेंब यावा. बाळाच्या खोड्या बघून हसता हसता आईच्या डोळ्यात पाणी यावं.

आयुष्यभर नालायक समजलेल्या मुलाच्या समजुतदार पणाने बापाने हळूच डोळे पुसावे. हे अश्रू सगळे किती महत्त्वाचे आहेत.

तुम्ही एक वेळ पडलात तरी तुम्हाला नंतर ते आठवत नाही. पण तुम्ही कधी रडलात तर ते कायम लक्षात रहातं. अश्रू सहज विसरता येत नाहीत.

अश्रू बद्दल सांगायचं कारण एकच डोळ्याचं आणि मनाच खूप जपलेले ते एक सिक्रेट (रहस्य) असतं.



#S18

# आयुष्याचे समर्थन

चिमणी दार उघडते. आणि बघते की कावळा बाहेर नाही. चिमणी टेंशनमध्ये येते. "नक्की कावळ्याला काय पाहिजे होते?" या विचारात कावळ्याला शोधण्यासाठी ती बाहेर पडते. कावळ्याला फार शोधते. कारण कावळा आणि चिमणी लहानपणीचे मित्र - मैत्रीण असतात. भरपूर शोधल्यानंतर. कावळा चिमणीला एका तुटक्या घरात भेटतो. त्याची अवस्था फार वाईट असते. तो दारू प्यालेला असतो. चिमणी त्याला बघून दु:खी होते, कारण स्वत:च्या जीवनात कावळा एवढा यशस्वी असतो, तरीही तो येवढा हताश का? असा तिला प्रश्न पडतो. ती कुतूहलाने त्याला तसे विचारते, त्याबरोबर लगेच कावळ्याच्या डोळ्यातून अश्रुधारा कोसळतात. आणि तो सांगतो कि, "आयुष्यभर येवढी मेहनत केली स्वत:च्या परीवारासाठी एवढं नाव कमावलं. सगळं चालू होतं. परंतु तेव्हा सर्व कमाई परीवाराच्या नावावर केली तेव्हा त्या परीवारानेच मला बेदखल केलं" आणि हे सर्व सांगून कावळा शांत झाला.

नंतर तो हताश होवून म्हणाला, 'चिऊताई मला आता एकट राहण्याचा कंटाळा आलाय म्हणून मी आत्महत्या करायला जात होतो. तेव्हा तुझा अखेरचा निरोप घ्यायला आलो होतो' हे एकताच चिमणी हबकतेच. पण लगेच कावळ्याला सावरते. तेव्हा त्या दोघाना एक कबुतर दिसते जे वाटेतच तडफडत असते. तेव्हा कावळा त्या कबुतराला पाणी पाजतो. आणि कबुतर सावध होवून निघून जातं. तेव्हा चिमणी कावळ्याला बोलते. कि "हे बघ कावळ्या तू तुझं आयुष्य समाप्त करायला जात होतास परंतु तुच कोणाचा तरी जीव आतायाक्षणी वाचवलास जर अशीच तू तुझ्या आयुष्यातील लोकांची मदत करत राहिलास

तर संपूर्ण जगातील लोकं तुझा परीवार बनेल. आणि ही सगळी माणसे हीच तुझी धनदौलत असेल. तेव्हापासून कावळ्याने आपलं सारं आयुष्य लोकांना मदत करण्यात घालवलं आणि आज सार जग कावळ्याच्या परीवार झालं आहे.

(अनामिका)
अभिजित साळवे
(तृतीय वर्ष-कला)

# चिमणी आणि कावळा

चिमणीला जेव्हा आठवत की कावळा तिची दारात वाट बघत होता तेव्हा ती त्याला शोधू लागते. चिमणी कावळ्याला शोधत असताना तिला कावळ्याविषयी वाईट वाटते कारण कावळा बिचारा तीची वाट बघत होता. आणि वाट बघत बघत बिचारा तो निघून गेला. चिमणी कावळ्याला खुप शोधते पण तो बिचारा तिला भेटत नाही. नंतर खुप वेळाने ती आपल्या घरट्यात जाते. कारण कावळा तिला कुठेच भेटत नाही. काही काळाने कावळा परत तिच्या घरट्यात येतो. व दार ठोठावतो. चिऊताई दार उघडते आणि तिला कावळ्याला पाहून आनंद होतो. चिऊताई कावळ्याला सांगते की, मला माफ कर. तू माझी इतकी वाट बघत होतास पण माझ्या लहान बाळाकडे माझ लक्ष असल्यामुळे मी दार उघडायला विसरते. नंतर ते पाहून कावळ्याला चिऊताईची दया आली. आणि त्यानी हसत हसत तिला माफ केले.

या सगळ्यानंतर चिऊताई कावळ्याला विचारते की, तू दार ठोठावल्यानंतर तू तू निघून का गेलास ? आणि का आला होतास ?

तर कावळा म्हणाला की, मी तुझ्या त्या छोट्याशा बाळाला भेटायला आलो होतो. पण तू काही दार बाळाला भेटायला आलो होतो. पण तू काही दार उघडल नाहीस आणि तुझ तुझ्या बाळावरच प्रेम बघून मला खुप छान वाटले कारण तुझ लक्ष तुझ्या फक्त बाळावरच होत तुला आजूबाजूच जग दिसतच नव्हत कारण तू तुझ्या आजूबाजूच जग दिसतच नव्हत कारण तू तुझ्या बाळालाच आपल जग मानल आहेस. तुम्ही दोघं एकमेकांसाठीच आहात तुमच्याकडे अद्वेतरूपी प्रेम जग मानल आहेस हे पाहून मला फार आनंद झाला.

कावळ्याचे हे बोलणे ऐकून चिऊताईच्या डोळ्यात पाणी थेंब आपल्या पतीच्या निधनाच्या दुःखाच्या आठवणीने ती हेलावते. आणि ती आपल्या बाळाला अधिकच जवळ घेते. अनाथ असलेल्या कावळ्याला चिऊताईचे बाळावर असलेले प्रेम पाहून खुप आनंद घेतो. तो त्या बाळाच्या अस्तित्वात आपल प्रतिबिंब शोधत - शोधत परत निघुन जातो.

ओंकार शिवतरकर
द्वितीय वर्ष - कला.

# माणुसकीची अंधश्रद्धा

चिऊताई चिऊताई दार ऊघड असे कावळा चिऊ ताईला विनंती करत असतो. कारण कावळ्याच घरट हे नैसर्गिक अपत्तीमुळे कावळ्याचं घरट वाहून जात त्यामुळे आपल्या राहण्याची, खाण्याची, पिण्याची सोय कशाप्रकारे होईल. त्या विचारामध्ये असताना तो आपल्या चिऊताई कडे जातो. कावळा चिऊताईच्या दरवाजा ठोकवतो. पण चिऊताई मात्र दरवाजा उघडत नाही. पावसाच्या वेग वाढलेला असतो. कावळ्याला हवेच्या वेगामुळे कावळ्याला ऊडण्यास त्रास होत असतो. शेवटी कावळा चिऊताईच्या दरवाजा ठोकून कंटाळतो. चिऊताई आपल्या पिल्लांना आंघोळ घालण्यात व्यस्त असते.

कावळाचे तरीही दरवाजा ठोकण्याचे प्रयत्न चालू असतात. अचानक एक जोरात वाऱ्याचा झोका त्याला घरट्यापासून दूर घेवून जातो. त्याला स्वताच्यातोल संभाळता येत नाही. त्यामुळे तो अचानक एका विद्युत तारेला अडकून त्याचा मृत्यु होतो. व त्या कावळ्याच्या मृतदेह हा त्या चिमणीच्या घराच्या बाजूला असणाऱ्या नदीच्या काठाला पडलेला असतो. काही तासांनी पावसाचा वेग कमी होतो. व सर्व सुंदर हिरवळ पसरली. होती दार उघडते ती दार ऊघडताच तिच्या शेजारी राहणारी चिऊ काकी त्या चिऊताईला बोलली कि चिऊताई चिऊताई तुमच्या घरी कावळा आला होता. त्यांनी तुझा दरवाजा खूप ठोकला पण तु त्याला घरात का नाही घेतलसं. त्याच घर . वाहून गेलय म्हणून तो तुझ्याकडे मदत मागायला आला होता. तु कावळ्याला का मदत केलीस नाहीस ?

चिऊताई रागाने बोलली आमच्या धर्मात, जातीत, काळा हा रंग अशुभ मानला जातो. म्हणुन मी कावळ्याला घरात घेतले नाही. चिऊकाकी त्यावर म्हणाली, पण

तो आपल्या मधला आहे ना.

पक्षी त्याला ही एक चोच दोन डोळे, दोन पाय मग एवढा भेदभाव का ? आणि मग निराश होऊन चिऊकाकी चिऊताईला बोलते." जा त्या नदीच्याकाठी त्याचा मृतदेह पडलाय. जा बघ जा।" हे ऐकताच चिऊताईला खूप वाईट वाटत आणि तिला अश्रू थांबवत नाहीत

माणुसकी हि अत्यंत महत्त्वाची आहे.

निहाल मेस्त्री
(प्रथमवर्ष - कला)

# एक खडतर प्रवास

माझे बालपण हस्तनपूर या छोट्याश्या गावी गेले. त्या गावात एकच छोटस किराणा मालाच दुकान होत. त्यावेळी आमच्या घरची अत्यंत हालाखीची परिस्थिती होती. आम्ही घरात चार भावंडे होतो. पण कधी आमच्या आई- वडिलांना सणाला- दिवाळीला आम्हाला कपडे घेता आले नाहीत. आमच्या मामा आई आम्हाला वर्षातुन दोन वर्षातुन एकदा कपडे घ्यायची.

आमच्या आई- बाबांनी खुप कष्ट केले घरामध्ये काका, आत्या, आजी- आजोबा, आम्ही भांवडे होतो परिणामी आम्हाला ५० पैशांच्या रिफीलवर वर्षभर एकाच वहीत अभ्यास करावा लागत होता. आमच्या गावी पहिली ते चौथी पर्यंत शाळा होती.

पाचवी पासून पुढे आम्हाला ५ कि. मी अंतरावर जायला लागायचे. त्यावेळी आम्हाला गाडी नसायची किंवा कोण सोडायला यायंच नाही. चालत जायचो. जाताना मी दिदी आणि गावातील मित्र, मैत्रीणी असायची. आमच्या सोबत ५-५ किलो दळण घरातले द्यायचे आणि येताना दळण घेऊन यायचो. त्यावेळी शाळेतली मुल पैसे आणुन खाऊ खायची. आम्ही आई कडुन मागुन पैसे घ्यायचो पण आई माझी आमच्या गावापासुन १५ कि. मी अतरांवर एक गाव होत त्या गावी ती खड्डा खोदण्याचे काम ती करायची ते काम आईला थोडसे पैसे आणि गहु, तांदुळ मिळायचे.

आम्ही शाळेतुन घरी आली की घरी बसायच नाही रानात जायचे आणि दिवसभर घरातील लोकांनी जे गवत काढल असायच ते सगळ करायच का तर काका बोलायच हे सगळ गवत काढुन झाल्यावर आम्हाला ४ रुपयेचा बिस्कीट चा पुडा देतो.

पण आमच्या चौघां भावांडात छकच पुडा द्यायच्या कधी कधी तर द्यायचाचं नाहीत.

बाबा माझे बाजारला गेले की खायला आणायचे. पण आम्हाला आई घरात असली तरच मिळायच. नाही तर आत्या आणि काका द्यायचे नाहीत. आई-बाबा दिवसभर दुसऱ्याच्या, घरच्या रानात जायचे. सुट्टीच्या दिवशी आत्या आम्हाला लसुन, थोड तिखट-मिठ टाकुन भाजी द्यायची. आणि तिला अड्याची भाजी करून खायची. मी सहावीत असताना घरातील लोकांनी आई-बाबाना घरातुन हाकलुन काढलं त्या वेळी आम्ही थोडसं सामान घेऊन आमच्या मावशीच्या गावी आलो आणि तेथे शाळा शिकलो.

ज्या ठिकाणी राहत होतो ती जागा मावशीची होती. रानात आम्ही रहायचो तेथे दोन-चार घरे होती पण थोड्या-थोड्या अंतरावर होती. तेथे राहायची सोय नव्हती. तेथे आम्ही दुसऱ्याच्या शेतात जायचो. दिदी, मी आणि आई तिघीही जायचो. जाताना शेतात म्हैस, दोन शेळी, हा जनावरांचा गोतावळा असायचा. रानात गेल की आई मधी असायची आणि आम्ही दोघी दोन्ही बाजुला असायचो. ती तिची सरी भागंलुन आमच्या दोघींना मदत करायची. अन् आयच्या दोघींना शेतातील गवत काढायला सांगायची तेव्हा कुठे आम्हाला तिघींचा रोजगार मिळायचा.

मी इयत्ता दहावीत असताना माझी बोर्डाची परिक्षा चालु असताना पेपरला कधी कधी दोन-तीन दिवस सुट्टी असायची. त्यावेळेस मी आई-सोबत रानात जायची. तेवढेच पैसे मिळायचे. १० वी नंतर पैशाची अडचन असल्याने माझे शिक्षण दोन वर्ष थांबले. पण नंतर मी अकरावीला ॲडमिशन घेतल पण अकरावीला ही रोज कॉलेजला जायची नाही. दिवाळीच्या आधी पहिली सत्र परिक्षा होती त्यात मला प्रथम क्रमांक मिळाला

त्यावेळी आमच्या कॉलेजच्या मराठी विषयीच्या शिक्षीकांनी घरी येवून आईला माझ्या पुढील शिक्षणासाठी सांगितल. मग आईने मला पुढील शिक्षण' घ्यायला परवानगी दिली. मी बारावीपर्यंत शिक्षण घेतल खर पण भरपूर अडचणी आल्या.

अकरावीची परिक्षा संपल्यानंतर अनेक स्थळे बघायला यायची मी त्यावेळी आई-बाबांना बोलली मी लग्न करेन शेतकरी असु द्या किंवा कोणी पण मला शिकायचे आहे. मी निश्चय करून त्या माणसांना बोलली मला लग्नानंतर शिकायचे आहे. तुमची तयारी असेल तर मी लग्नाला तयार आहे.

१२ वी मध्ये माझ लग्न झाल त्यावेळी नवऱ्याच्या मामांच्या घरी राहुन मला १२ वीच शिक्षण कराव लागल. तरीही मोबाईल माझ्याकडे नव्हता. मी त्यांच्या घरीही काम करायची. त्यावेळी मी माझ्या नवऱ्याला विचारलं तुम्हाला माझ्याकडुन किती टक्क्यांची अपेक्षा आहे त्यांनी सांगितल ६०, ६५ % असली तरी ही बास झाली. मला १२ वी मध्ये ७७.१२% मिळाली होती.

नंतर मी १३ वी मुंबईला आले मला ॲडमिशन मिळाल तेव्हा ही मला खुप अडचणी आल्या. घरातील कामे, कॉलेज घरातील लोकांना सांभाळणे कठीण जात होते पण या शिक्षकव्यातुन मला खुप मोठा अनुभव आला.

माझ्या आयुष्यात मला माझ्या नवऱ्यांनी खुप मेहनत घेऊन मदत केली. माझ्या ॲडमिशनसाठी लागणारी पाच हजार रुपये फी त्यांनी रात्र, दिवस काम करून मला मिळवुन दिले.

कॉलेजमध्येही इतर मुली म्हणायच्या तुझे कपडे साधे आहेत. तु अशी का राहतेस ? तेव्हा मनाला वाईट वाटायच पण ते तात्पुरतेच होत. दिवसभरात मी काय-काय

करते. ते मी घरी नवऱ्याला सागांयचे, नव्हे अजुनही सांगते. ते म्हणतात, आपल्याला माहीत आहे घरातले खर्च भागवुन आपल्याला मजा करायला पण नाही अन् पैसा पण मिळत नाही पण "घाबरू नकोस आपलाही एक दिवस येईल."


खरच, आपण सुखी समाधानी राहीलो की सर्व काही सुरळीत होत. कॉलेजमध्ये मला आमच्या मराठी विषयींच्या शिक्षीका आकांक्षा मॅडमयांनी मोलाच सहकार्य केल आहे. त्यांचे हे सहकार्य लाख मोलाच आहे त्याचे मी आभार मानते.

ज्यावेळी मानसाला अडचणी येतात आणि त्या अडचणी परिस्थितुन माणुस शिकत असतो त्यावेळी त्या माणसाला खुप अनुभव मिळतो. त्या अनुभवातुनच माणुस शिकतो. त्यातुनच तो घडतो हे माझ्या आयुष्यात घडलेल्या घटनांमधुन मला जाणवते आहे.

अर्चना दुर्योधन शिंदे
(तृतीय वर्ष - कला)

# अखेरचे हसू

आई गेल्यानंतरचे वडील अबोल झाले,
हसण्याचा प्रकार ते कायमचे विसरून गेले.
आई गेल्याचे विसरून रिकामाच डबा नेऊ लागले
कधीकधी किचनमध्ये जाऊन एकटेच बडबडू लागले.
बाबा एकटे एकटे पडले असले तरी खंबीर राहायचे,
मनातले दु:ख मनातच लपवून कुढत राहायचे.
रोजच्या जेवणाचे एक ताट कमी झाले होते.
हसते खेळते घर क्षणात हरवले होते.



अनुज पवार
(तृतीय वर्ष कला)

# शिकत असलेले मराठी वाङ्मय

मराठी वाङ्मय हे कधी निर्माण झाले ? या संकल्पनेचा नेमका अर्थ काय ? वाङ्मयाचा इतिहास काय आहे ? या इतिहासातुन शिकताना आपल्याला काय अनुभव मिळतात ? हे जाणुन घेणे फार महत्त्वाचे वाटते.

मी लहानपणापासुन शिकत आलेले मराठी वाङ्मय मला खुपच आवडत होते. हे वाङ्मय शिकताना आपल्या मनास मिळणारे वेगवेगळे अनुभव हे जाणुन घेताना मन हळुवार बनते. लहानपणीच्या मराठीतल्या त्या कविता, त्याला अनुसरून असणारे मराठीतले काही गद्यमय पाठ हे शिकत असताना आम्ही वाङ्मयाच्या त्या चंदेरी दुनियेत रममाण होऊन त्याचा आस्वाद घेत लहानाचे मोठे झालो. आणि मग मराठी वाङ्मयाच्या प्रेमात पडलो. या वाङ्मयाचा इतिहास शोधण्याचा प्रयत्न महाविद्यालयातील अभ्यासक्रमातून केला.

वाङ्मय इतिहास :-

मराठी वाङ्मय ही संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात आलेली दिसून येते. ही संकल्पना १२ व्या शतकापासुन वाङ्मयरूपात सुरू झालेली दिसुन येते. या वाङ्मयातून आपणांस गद्य व पद्य असे दोन भाग पडलेले दिसतात. मराठीमध्ये वाङ्मयाचा अभ्यास करण्यापूर्वी आपण अनेक गोष्टींचा विचार करतो. मराठीमध्ये शब्दांचे सौंदर्य शिकण्यास आपणास आवडते कारण ते आपल्या बुद्धीला मिळालेले एक आवाहन असते.

मी शाळेत असताना । येरे येरे पावसा । ही कविता शिकत असताना

आम्ही अगदी पावसात ओलेचिंब होत होतो. कारण आमचे शिक्षक ही कविता शिकवताना त्यात त्या स्वत: तर तल्लीन होतच असत पण आम्हालाही त्या शब्दार्थांमध्ये एकरूप करून घेत असत. मराठीत असणारे गद्यमय स्वरूपाचे धडे हे अगदी गोष्टी रूपात असल्याने शिकत असताना अनेक प्रसंगातून आम्हाला चैतन्याचा अनुभव येत होता.

पण जेव्हा आम्ही महाविद्यालयात गेलो तेव्हा मराठी वाङ्मयप्रकारातील अनेक बदल आम्हास जाणवले. हे बदल शिकत असताना काही मुलांची होणारी मनाची अवस्था व त्यात असणारी शब्दांची गर्दी हे बघून लहान असतानाचे मराठी हे किती सुंदर होते. व महाविद्यालयातले मराठी वाङ्मय हे किती किचकट आहे असे वाटू लागले. या वाङ्मयातून बरेचसे काही शिकायला व अनुभवायलाही मिळाले.

त्यात जरी शब्दांची गर्दी असली तरी हे शब्द जाणून घेण्यात फार मोठी मजा आहे. आव्हान आहे. या वाङ्मयाचा अभ्यास करताना विविध समाजातील लोकांच्या संस्कृतीचाही अभ्यास करावा लागतो. पर्यायाने या अभ्यासातून आपण सुसंस्कृत बनतो. आणि योग्य दिशेने घडत जातो. विचारांनी समृद्ध होतो. हेच तर आहे या मराठी वाङ्मयाचे सामर्थ्य.

योगिता कसबे
(तृतीय वर्ष कला)

# रितेपण

आई गेल्यानंतरचे पडील अबोल झाले ।।
मनातील भावनांचे काहूर डोळ्यांत दाटून आले ।।
जिवाभावाची होती माणस चार,
तरी जीवन एकाकी वाटू लागले ।।
आई,
आई म्हणजे होती जीवाभावाची मैत्रीण,
पण ती काळरात्र झाली आमच्या आयुष्याची वैरीण ।।
तिच्याशिवाय झाले सारे घर सुने सुने,
तिच्याविणा आयुष्य भासे उणे उणे ।।
पडीलांसह अख्खं आयुष्य सोबत राहून बनली त्यांची सहचारिणी,
सगळे असून मुले अनाथ झाली, बनली...
" स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी ।।"

श्रध्दा धावजी भालचिम
(द्वितीय वर्ष कला)

# आत्महत्या

परवाच माझ्या मित्राने आत्महत्या केली.
घरगुती मरण त्याला आवडल नाही.
लहानपणापासून स्वाभिमानात जगणारा,
वाटला नव्हतं असं की होईल सामान्य मरणारा
सर्वांना सांगणारा शूर शिवबाची गोष्ट
का, कोणास ठाऊक असं करून - घेतलं स्वतः:च आयुष्य नष्ट.
करायचे सोडुन आई- वडिलांचे स्वप्नं मोठे.
करून टाकले त्यांनी सर्व खोटे
आयुष्यातले अडथळे सहन करू शकला नाहीस तू
स्वप्नांसकट सारं जग मागे टाकून गेलास तू
एकदा तरी विचार केलास ? काय होईल तु
गेल्यावर तुझ्या आई- वडिलांचे, त्यांच्या मनात येतील विचार,
नक्की जगायचे का मरायचे ?
चुकलास तू स्वत:चा जीव देऊन
गेलास सर्वांचे सुख आनंद सोबत घेऊन
मला वाटल नव्हतं आयुष्याबदल असशील तू एवढा मित्रा.
कसा ही असो आयुष्यभर स्मरणात राहशील तू माझ्या
मित्रा...

अभिजीत साळवे
(तृतीय वर्ष कला)

मुस्कान. पुजा सुरज

निकिता

स्वाती

सोनाली.

komलशिंde

ओमकार शिं.

र.काळंबे

ह. पवार

अनुज पवार

गणेश

म.आबनावे.

संजूगावडे

प्रतिक माधव

अभिजीत साळवे

मयुरशिंदे

अर्चना.

योगीता

ओमकार

श्रध्दा

कोमल ससाणे.

मोनिका

प्रिता





एन्. ई. एस्. रत्नम महाविद्यालय
कला, शास्त्र आणि वाणिज्य
मराठी वाङ्मय मंडळ
'A' GRADE
NAAC Re-accredited
(3rd Cycle)
सुवर्ण क्षण
स्पंदन
स्पंदन
स्पंदन
२०१६ - २०१७
॥श्री॥
एन्. ई. एस्. रत्नम महाविद्यालय
मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळ
"मराठी भाषा दिन"
२४ फेब्रुवारी २०१८
कवीवर्य कुसुमाग्रजांच्या स्मृतीप्रित्यर्थ व
मराठी भाषा संवर्धनाप्रित्यर्थ
विद्यार्थ्यांतर्फे : विविध सांस्कृतिक कार्यक्रम
वेध अंतर्यामीचा : विद्यार्थी - शिक्षक - पालक
सुसंवाद (परिसंवाद)
शनिवार - दिनांक २४ फेब्रुवारी २०१८
वेळ - सकाळी. १०:३० ते १:३०
स्थळ - ए. व्ही. रूम
UDAAN